# मेट्रो-३चा आणखी एक टप्पा पार

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा ते सीप्झ या बहुप्रतीक्षित मेट्रो-३ मार्गिकेने कामाचा आणखी एक टप्पा पार केला आहे. सीप्झ ते एमआयडीसी स्थानकादरम्यानचे रुळांचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) बुधवारी दिली.

मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम सुमारे ९९ टक्के पूर्ण झाले आहे. याबरोबरच रूळ व अन्य कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. सद्यस्थितीत भुयारीकरणाचे काम पूर्ण झालेल्या मार्गांवर रूळ अंथरण्याचे काम सुरू आहे. प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाच्या भागातही रुळांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच दादर आणि शीतलादेवी या स्थानकांदरम्यानच्या अप लाइन मार्गिकेवर आणि विधानभवन मेट्रो स्थानकाच्या भागात डाऊन लाइन मार्गिकेवरील कामही पूर्णत्वास गेले असल्याची माहिती 'एमएमआरसीएल'ने दिली.



## सीप्झ ते एमआयडीसी दरम्यानच्या रुळांची कामे पूर्ण

मेट्रो-३ मार्गिकेवरील रूळ रेल्वे मार्गांवरील रुळांपेक्षा भिन्न म्हणजे 'लो व्हायब्रेशन ट्रॅक' पद्धतीचे आहेत. मेट्रो गाडी रुळांवरून गेल्यानंतरही तिचे धक्के आजूबाजूला जाणवणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या रुळांमध्ये गाडीचे कंपन शोषून घेतले जाणार आहेत. परिणामी मेट्रोच्या बोगद्यात हादरे जाणवणार नाहीत, असेही 'एमएमआरसीएल'कडून सांगितले जात आहे.

दरम्यान, रुळांच्या कामांना गती आल्याने आता मेट्रो मार्गिकेच्या चाचण्यांना वेग मिळण्याची चिन्हे आहेत. 'एमएमआरसीएल'कडून येत्या काही दिवसांत मेट्रो-३ मार्गिकेवरील पहिली मेट्रो मुंबईत आणली जाणार आहे. त्यानंतर मरोळ स्थानकापर्यंतच्या रुळांची कामे पूर्ण होताच, चाचण्यांना सुरुवात केली जाईल. पुढील वर्षी डिसेंबरमध्ये मेट्रोचा सीप्झ ते बीकेसी टप्पा सुरू करण्याची घोषणा 'एमएमआरसीएल'ने केली आहे. त्यामुळे कामे वेगाने करण्यावर भर दिला जात आहे.